# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे खाली नमूद केलेल्या पदाच्या मुलाखती दिनांक ११ व १२ जून, २०१८ रोजी आयोजित केल्या असून मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहेत. तसेच उमेदवारांना मुलाखतपत्रे www.mahampsc.mahaonline.gov.in या वेब-साईटवरील उमेदवारांच्या **My Account** मध्ये **'थेट भरती'** मधील **'मुलाखत'** या विभागामध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच पात्र उमेदवारांना sms द्वारे कळविण्यात आले आहे. या संदर्भात अधिक तपशिलासाठी आयोगाच्या **कुपरेज टेलिफोन निगम इमारत, ८ वा मजला, कुपरेज, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई – ४०० ०२१** येथील मुख्य कार्यालयात संपर्क साधावा.

| अ. क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ९६/२०१५ | सहयोगी प्राध्यापक - वनस्पतीशास्त्र, शासकीय विज्ञान संस्था महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) उच्च व तंत्रशिक्षण विभाग | दिनांक ११ जून, २०१८ स. ९.४५ वा. |
| २ | १२५/२०१५ | प्राध्यापक - जीवशास्त्र, शासकीय विज्ञान संस्था महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) उच्च व तंत्रशिक्षण विभाग | दिनांक १२ जून, २०१८ स. ९.४५ वा. |

विचाराधीन पदाच्या मुलाखतीस पात्र ठरणा-या सर्व उमेदवारांनी मुलाखतीच्यावेळेस आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करण्याकरिता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त पदाची मुलाखत वर नमूद पत्त्यावरील आयोगाच्या मुख्य कार्यालयात घेण्यात येईल.

दिनांक २९ मे, २०१८

श्री. शं. पाठक
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग